# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  १३/०४/२०२४

## जबरी  चोरी:-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अप क्र. ३७४/२४ कलम ३९२ भादवी | बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ इर्विन चौक अमरावती | घ.ता.वेळ दि.१५/०३/२०२४ चे १२.०० वा दरम्याण<br><br>दा.ता.वेळ दि.१२/०४/२०२४ चे १७.०२ वा. | दिनेश रतनलाल माधवानी वय ४८वर्ष रा.रामपुरी कँम्प ,झुलेलाल लाईन अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद फिर्यादी दि.१५/०३/२०२४ ते १०.३० वाच्या दरम्याण फिर्यादीच्या पायाला दुखापत झाल्याने त्याचे एस रे काढणे करीता उपचार करुन मी इर्वीन चौकातील बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ माधवानी यांना फोन करण्यासाठी मी फोन खिश्यातुन बाहेर काढला तेव्हा मागुन कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मला धक्का देवुन माझा हातातील मोबाईल फोन हिसकावुन पळुन गेला अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | झोन क्र. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदगाव पेठ अंप नं १३८/२४ कलम ४५४,४५७ ,३८० भादवी | १ | राहते घरी गणेशविहार कॉलनी रहाटगाव | १-४-२४ वाते १२-४-२४ चे १२-३० वा<br><br>दा १२-४-२४ चे १८-४४ वा | एक महिला | अज्ञात | | हकिकत असा प्रकारे आहे कि फि चे नविन घराचे बांधकाम झाल्रे असुन तिथे कोणी राहत नाही १-४-२४ चे ११-०० वा फि व त्याची पत्नी त्याचे घर हे बंद करुन आले होते व आज रोजी फि व त्याची आई ने जावुन पाहीले असता मुख्या घराचा लाकडी दरवाज्याचा क्ड्डा तुटलेला दिसला व घरात पाहीले असता सिंलेडर ईडियन कंपनीचे कि अं ५००रु हँवन्स मिक्सर कि अं १००० रु शेगडी १००० रु पितळी मुर्ती ५००० रु अशा एकुन ७५०० रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला अशा फि याचे जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरीः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वलगाव अंप नं 125/2024 कलम 379,34 भादवि प्रमाणे दाखल. | ग्राम टाकरखेडा शंभु | 10/04/2024 चे 13.30 वा दरम्याण दाखल दि.12/04/2024 चे 20/47 वा. | मोहम्मद फैसल शेख रहीम वय 41 वर्ष,धंदा-शिक्षण,रा.मुगल हॉलच्या मागे अरफात कॉलनी वलगाव रोड,अमरावती | रामदास बापुरावजी लवटे वय 53 वर्ष 2) सनी ऊर्फ हेमंत रामदास लवटे वय 23 वर्ष दोन्ही रा.टाकरखेडा शंभु ता.भातकुली जि.अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, दिनांक 08/04/2024 रोजी मला अब्दुल जावेद याने कॉल करुन सांगितले की, माझे गायवाळामध्ये ठेवलेले काही तुरचे कट्टे हे गायब झाल्याने त्याने त्यावर लक्ष्य ठेवले असता दिनांक 10/04/2024 रोजी दुपारी 1/30 वाजताचे सुमारास गावातील इसम नामे रामदास बाबुरावजी लवटे वय 53 वर्ष व त्याचा मुलगा नामे सनी उर्फ हेमंत रामदास लवटे वय 24 वर्ष हे गायवाळयाच्या कंपाउडमधुन उडी टाकुन एक तुरीचा कट्टा चोरी करताना दिसुन आले. तेव्हा मी गावामध्ये आलो व माझे गायवाळामध्ये पाहणी केली असता माझ प्रत्येकी 70 किलो वजनाचे तीन तुरीचे कट्टे अं.कि. 10,000/- रुपये हे चोरी झाल्याचे दिसुन आले. तेव्हा मी रामदास लवटे व त्याचे मुलास माझे तुरीचे कट्टे परत करण्याबाबत सांगितले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे देवुन तुरीच्या कट्टयाबाबत काही माहीत नसल्याचे सांगितले. तेव्हा मी ते माझे तुरेचे कट्टे परत देईल या विचारणाने काही दिवस थांबलो पण ते सदरबाबत काही बोलले नाही तेव्हा मी सदरबाबत तक्रार देण्यास पोलीस स्टेशनला आलो. तरी माझे तुरीचे तीन कट्टे चोरी करणारे इसम नामे रामदास बाबुरावजी लवटे वय 53 वर्ष व त्याचा मुलगा नामे सनी उर्फ हेमंत रामदास लवटे वय 24 वर्ष यांचे विरुध्द तक्रार आहे.अशा लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गाडगेनगर अमरावती अप क्र. ३७५/२४ कलम ४१७,४२०, ४६५, ४६७,४७१, १२०(ब), ३४ भादवी | मा.जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती | घ.ता.वेळ दि.१२/०४/२०२४ पुर्वी माहीती दा.ता.वेळ दि.१२/०४/२०२४ चे १९.४८वा. | १)एक महिला ,२) सुरेश सुखदेवराव मारवाडे दोन्ही रा.मरीमाता मंदीरजवळ चिंचफैल अमरावती | १) श्री. रुपेश गजानन बेरघाटे रा.आनंदवाडी कठोरा रोड अमरावती , २) श्री.सोहनलाल भैयालाल कुरील रा.रविदास समाज मंदीर बेलपुरा अमरावती, ३) श्री.अविनाश श्रीधर काळे रा.स्वामी समर्थ मंदीर चौक ,शिवाजी चौक अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातिल नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी दुस-याचे मालकी हक्काचा असलेला प्लॉट यातील आरोपीनी फि सोबत इसार चिठ्ठी करुन दोन लाख रुपये नगदी व तिन लाख रुपये धनादेश असे पाच लाखाचे आरोपीतांनी फि ची फसवणुक केली |
| २ | गाडगेनगर अमरावती अप क्र. ३७६/२४ कलम ४१७,४२०, ३४ भादवी | मा.जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती | घ.ता.वेळ दि.१२/०४/२०२४ पुर्वी दा.ता.वेळ दि.१२/०४/२०२४ चे २०.३३वा. | मनोज बाबुराव बारब्दे वय४१ वर्ष रा.व्दारा गजानन वासनकर शान होडा चे मागे गाडगेनगर अमरावती | १) व २) महिला ३) श्री कुणाल संजय गायकवाड सर्व रा.डॉ मशान कर यांचे दवाखान्या मागे बेलपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातिल नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिचे पत्नीची आरोपीतांनी नोकरी लावुन देतो असे आमीश दाखवुन आरोपीतांनी फि कडुन तेरा लाख रोख रक्कम घेवुन फसवणुक केली. |

## अपघात :

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदगाव पेठ अप ंम १३७/२४ कलन्म २७९,४२७ भादवी | टोलनाका | ११-४-२४ चे १८-३० वा दि १२-४-२४ चे १-५५ वा<br>दा १२-४-२४ चे १८-११ | लक्ष्मण पुडलीक रेवगडे वय ४५ वर्ष रा रहाटगाव | वाहन क्र एम एच ४० वाय १७१४ २) maw -३axl चे चालक | हकिकत असा प्रकारे आहे फिहे टोलनाका नांदगावपेट येथे व्यवस्थापक या पदावर आहे.यातील आरोपी ट्रक क्र १) वाहन क्र एम एच ४० वाय १७१४ २) maw -३axl चे चालक हयगईणे व निष्यकाळ्जीपनाने चालवुन ११-४-२४ चे १८-३० वा अमरावती वरुन नागपुर कडे जाताना टोल न भरता बँरिगेट तोडुन निघुन गेला व परत येत असताना १२-४-२४ चे १-५५ वा नागपुर कडुन अमरावती कडे जाताना बँरिगेट तोडुन निघुन गेला व बँरिगेटचे नुकसान केले अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती अप क्र ३६३/२०२४ कलम १८४, १८५ मो वा का | बॉर्डर सिलींग पॉईट राजुरा नाका मार्डी रोड अमरावती | घ ता वेळ दि १२/०४/२०२४ चे १४/०० वा<br><br>रि ता वेळ दि. १२/०४/२०२४ चे १७/५६ वा | मपोकॉ फुलवंती सेवकराम धुर्वे बन १५४३ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती | रवी बाळकृष्ण गाडे वय ४७ वर्ष रा. आदर्श नगर गोपाल नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातिल फिर्यादी यांची लोकसभा निवडणुक अनुषंगानें बॉर्डर सिलींग पॉईट राजुरा नाका मार्डी रोड अमरावती येथे ०८.०० वा ते १४.०० वा पावेतो डयुटीवर सोबत मपोकॉ १२३३, व मपोकॉ८९१ असे वाहने चेककरिता असतानां नमुद घ ता वेळी व ठिकानी एक पांढ.या रंगाची कार नेक्सॉन क्र एम एच २७ डी एल २०३८ चा चालक दारूपीलेल्या अवस्थेत अमरावती विदयापीठकुन बेदरकारपणे कार चालवीत आला व बॅरीकेटला धडक मारुन बॅरीकेट पाडले त्यास फि ने थांबवीण्याचा प्रयत्न केला असता तो तेथे न थांबता समोर निघुन गेला फि ने सोबत असलेल्या पो स्टापने सदर आरोपीचा पाठलाग करुन त्यास थांबवले त्याने ब—याच वाहनांना धडक दिली त्याचे कार्यवाही करणे बाबत रिपोर्ट देत आहे अशा फिचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | खोलापुरी गेट अप क्रंमाक 102/2024 कलम 285 भादवी | रेल्वे क्रॉसींग बार्डर सिलींग पॉईन्ट भातकुली रोड अमरावती | घ.ता.वेळ दि. 12/04/2024 चे 19/30 वा दाखल ता.वेळ दि. 12/04/2024 चे 21/20 वा | सरतर्फे आंनद तायडे ब.न.1177 पो.स्टे.खोलापुरी गेट अमरावती शहर | सदाशिव बाबाराव वानखडे वय-52 वर्ष रा.खरकाडीपुरा | हकीकत अश्या प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने मानवी जीवीतास धोका उत्पन्न होईल अशा रितीने व हलगर्जीपणे ज्वलनशील गॅस सिलेंडर लावुन सार्वजनिक जागी नाश्यत्याचे खाद्य पदार्थ बनवितांना मिळुन आल्याने त्यास पो.स्टॉफ चे मदतीने ताब्यात घेवुन त्याचे पंचा समक्ष नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव सादाशिव बाबाराव वानखडे वय 52 वर्ष रा.खरकाडीपुरा अमरावती असे सांगीतले वरुन त्यास आपण मानवी मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल अशा रितीने व हलगर्जी पणे ज्वलनशिल गॅस सिलेंडर चा वापर करुन सार्वजनिक जागी नाश्यात्याचे खाद्य पदार्थ कसे काय बनवित आहात या बाबात वितारणा केली असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली.सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | अपनं ३६४/२०२४ कलम ६५ (अ)(ई) म.दा.का. | अमर कॉलनी अमरावती | दि. १२/०४/२०२४ चे १८/०० वा. ते १८/५० वा दरम्यान | दि. १२/०४/२०२४ चे २१/००वा. | सरतर्फे पोहेकॉ दिपक महादेवराव सुंदरकर बन १४५६ गुन्हे शाखा अमरावती शहर | जय देवकुमार हनवंते वय २४ वर्ष रा. माया नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद घ ता वेळी व ठिकानी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीलायकबातमी वरुन यातिल आरोपी नामे जय देवकुमार हनवंते वय २४ वर्ष रा. माया नगर अमरावती याचेवर फिर्यादी यांनी पो स्टाफ सह पंचासमक्ष प्रो रेड केली असता सदर आरोपीचे ताब्यातुन ७५ नग Whisky विदेशी दारूच्या सिलबंद पावटया कि अ ८५४०/रु चा प्रोव्ही माल व वाहन क्र एम एच २७ सि जी ४७९७ कि अ ६००००/रु असा एकुण कि अ ६८५४०/—रू.चा प्रोव्ही मुददेमाल जप्ती पंचनाम्याप्रमाने जप्त करण्यात आला नमुद आरोपी चे हे कृत्य कलम ६५(अ)(ई) म.दा.का.प्रमाणे होत असल्याने त्याचेवर गुन्हा दाखल |
| २ | नांदगाव पेठ | अप क्र. १३९/२४ कलम ६५ इ मदाका | ग्राम टाकळी जहागीर | १२/०४/२०२४ चे १७.०० वा | १२/०४/२०२४ चे २०.३४ वा | सपोउपनि क्र. ८५७ राजु काळे नांदगाव पेठ | रविन्द् भिमराव घोरे वय ४५ रा. टाकळी जहागीर | हकिकत अशा प्रकारे आहे की, घटना ता वेळी व ठिकाणी दि. १२/०४/२०२४पो नि सा आदेशाने आम्ही सपोनि राजु काळे क्र. ८५७ सोबत पोकॉ क्र. ५०२, पो स्टे एरीयात पेट्रोलिंग ड्युटी करीत असतांना ग्राम टाकळी जहागीर अंदाजे १७.०० वा दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की एक इसम अवैद्य दारु विक्री करीत आहे. वरुन पंचासमक्ष प्रोव्ही रेड केला असता दारु विक्री करणारा इसम दारु विक्री करतांना मिळुन आला.त्याला पंचासमक्ष ताब्यात घेऊन त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव रविन्द् भिमराव घोरे वय ४५ रा. टाकळी जहागीर असे सांगितले त्याच्या ताब्यातुन त्याचा जवळ असलेल्या एका कापडी थैलीत ९ नग देशी दारु बॉबी संत्रा १८० ए एल कि.अ.७००/- रु चा माल चा मिळुन आला त्याला परवाना बाबत विचारले असता परवाना नसल्याचे सांगितले मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त माला पैकी १८० एम.एल ची देशी दारु बॉबी संत्रा ची पावटी सी ए सॅम्पल करीता वेगळी काढण्यात आली त्यावर पंचाचे व आरोपीचे सहीचे कागदी लेबल लावुन जागीच सील केले व उर्वीरीत माल पो स्टे ला आणुन जमा केला अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पोस्टे राजापेठ | अप क्र २२१/२०२४ कलम | अमरावती | घटना ता. वेळ - दि १२/०४/२ | दाखल ता. वेळ - दि | सरतर्फे निलेश गुल्हाणे | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना मिळालेल्या गुप्त माहीतीवर पंचा समक्ष प्रोव्ही रेड केली असता महीला आरोपी अमरावती हिचे ताब्यातुन १७ नग देशी दारु टॅगो पंच ९० मिली चे कि.अं. ६८०/- रु. चा माल जप्त करण्यात आला आहे. वरुन महीला |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ६५ ई मदाका | | ०२४ चे १७.०० वा. दरम्यान | १२/०४ /२०२४ चे २०/२७ वा | ब.नं. २६ पोस्टे राजापेट अमरावती शहर | | आरोपी विरुध्द कलम ६५ ई मदाका अनवये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |
| ४ | पो.स्टे. खोलापुरी गेट अमरावती शहर | अप क्रंमाक 101/2024 कलम 65 (ई) मदाका | आंनद नगर अमरावती | घ.ता.वेळ -दि. 12/04/2024 चे 19/30 वा. दरम्यान | दाखल ता.वेळ - दि.- 12/04 /2024 चे 22/14 वा. | सरतर्फे पोहेकॉमंगेश कृष्णराव भेलाये वय- 43 ब.न.202 रा.पो.स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर | शुभम दिलीप हांडे वय 22 रा आंनद नगर अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व पो.स्टॉफ सह गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीवरुन नमुद आरोपीवर प्रो रेड केला असता त्याच्या ताब्यातुन बॉबी संत्रा देशी दारुचे पावट्या प्रत्येकी 180 एम.एल च्या 07 नग सिलबंद कि.अं 490/- रु चा प्रो व्ही पंचासमक्ष माल जप्त केला,अश्या फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

**अकस्मात मृत्यु :-**

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटाUkस्थळ | घटाUk ता वेळ दाखल ता वेळ | मृतकाचे Ukव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती मर्ग क्र २६ /२०२४ कलम १७४ जाफौ | मत्स्य कार्यालय कॉग्रेस नगर अमरावती | घ ता वेळ थ्द १२/०४ /२०२४ चे १५/०० वा रि ता | किसन गणपतराव कुरवाडे वय ७० वर्ष रा. करजगाव ता. वरूड जि. अमरावती | विजय किसन कुरवाडे वय ३४ वर्ष रा. करजगाव ता. वरूड जि. अमरावती | Brought Death (चक्कर येवुन खाली पडल्याने मृत्यु ) | हकिकत अशा प्रकारे आहे फि यांचे वडील हे मत्स्य व्यवसाय करित असल्याने ते त्या संबंधीत कामकाजानिमित्य अमरावती येथे येत होते नमुद घ ता वेळ व ठिकाणी फि चे वडील हे त्याचे सोबत संदीप नांदणे व दशरथ पाचारे असे मिळुन मत्स्य कार्यालय कॉग्रेस नगर अमरावती येथे कामानिमित्य आले होते दि १२.०४.२०२४ चे दुपारी ३.०० वा सुमारास मत्स्य कार्यालय कॉग्रेस नगर अमरावती येथे जात असतांना कार्यालयाचे पायरी वर फि चे वडीलांना अचानक चक्कर आल्याने ते खाली पडले व ते त्यानंतर काहि बोलत नसल्याने त्यांना सोबतचे संदीप नांदणे व दशरथ पाचारे यांनी त्यांना ईर्वीन दवाखाना येथे नेले असता तेथील एम ओ सा यांनी तपासुन त्यांना मृत |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेळ दि. १२/०४ /२०२४ चे २१/५७ वा | | | | घोषीत केले फि चे वडीलांनी  मरनाबाबत फि चा काहिही संशय नाही आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा मर्ग तपासात घेतला |